**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

# प्रेस नोट

दिनांक 08/04/2021 (गुरूवार)
(सकाळ)

---

## मोटरसायकल चोरी

पो.स्टे. रामटेक :— अंतर्गत 3 कि. मी. अंतरावर कवडक दुधाळा शिवार येथे दिनांक 06/04/2021 चे 14.17 वा. ते 17.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे— सुरेश बापुरावजी मथुरे वय 38 वर्ष रा. शास्त्री वार्ड रामटेक यांची एमएच—40/यु—9856 क्रमांकाची मोटरसायकल शेतामध्ये चाबी लावुन उभी करून ठेवली होती. त्यादरम्यान आज्ञत आरोपीने फिर्यादीची कि. 15,000/— रू. ची मोटरसायकल चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा राउत मो. 9423628307 हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. रामटेक :— अंतर्गत 6 कि. मी. अंतरावर डोंगरी येथे दिनांक 07/04/2021 चे 17.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे— बालकदास तुन्नीलाल शरनागत वय 50 वर्ष रा. डोंगरी हे आरोपी नामे— उमाकांन्त भागवत शरनागत वय 40 वर्ष रा. डोंगरी याच्या घराजवळुन शेतामध्ये जात असता आरोपी हा त्याच्या घरासमोर उभा असतांनी फिर्यादीस "तु माझे लेबरला का बिघडवले" असे म्हणुन आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करीत त्यांच्या डोक्याला लोखंडी रॉडने मारुन जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 324 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास नापोशी यादव मो. नं. 9637772404 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर